IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील कृषीपुरक पशुपालन व दुग्ध उत्पादन: एक भौगोलिक दृष्टीक्षेप

**डॉ. भालेराव ए. एस.**
सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व
भूगोल विभागप्रमुख,
चिस्तीया कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, खुलताबाद,
जि. छ. संभाजीनगर

**दळवी हेमंत भुजंगराव**
संशोधक विद्यार्थी,
भूगोल विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छ. संभाजीनगर.

**सारांश:**

कृषी हा मानवाचा मुख्य व्यवसाय, कृषीतूनच मानवाला अन्न व पशूंना चारा प्राप्त होतो. त्यामुळे मानव कृषीबरोबरच पशुपालन करून, दुभत्या पशुपासून दुध उत्पादन करत आहे. या दुग्ध उत्पानामुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास वाव मिळतो. अभ्यास क्षेत्राचा प्रमुख व्यवसाय कृषी, त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजूर कृषीला पूरक दुग्धव्यवसाय करत असल्याने त्याचा त्यांना आर्थिक फायदा होत आहे. म्हणून प्रस्तुत शोध निबंधात छ. संभाजीनगर जिल्ह्यातील वर्ष २०२३-२४ मध्ये दुभत्या गाई व म्हशी या पशूपालनाचा आणि त्यापासून संकलित दुध उत्पादनाचा अभ्यास केला आहे.

- **बीजसंज्ञा :** कृषी, चारा, पशुपालन, दुग्ध उत्पादन, संकलन, विकास

- **प्रस्तावना :**

मानवाचा प्राचीन व मूलभूत व्यवसाय कृषी व्यवसायामुळेच मानवाने भटके जीवन सोडून स्थायी वसाहती निर्माण केल्या. तत्पुर्वी अश्मयुगातील मानव रानटी अवस्थेत शिकार, कंदमुळे, फळे यावर आपला उदरनिर्वाह करीत असे. नंतरच्या काळात मानवाने गाई, बैल, मेंढी, डुक्करे, गाढव आत्यादी प्राणी माणसाळले, त्यातूनच पशुपालन व्यवसायाला सुरूवात झाली.[१] मानवाच्या आर्थिक प्रयत्नांचा कृषी हा एक मूलभूत व अत्यंत महत्त्वाचा घटक होय. यात अन्नधान्यांच्या लागवडीबरोबरच पशुपालनाचाही समावेश होतो.[२] मानवी जीवनाच्या विकासात कृषी बरोबरच पशुपालनाला विशेष महत्त्व आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी व पशुपालन यांना विशेष महत्त्व आहे. कृषी उत्पादनाबरोबरच शेतकऱ्यांना पशुपालनातून ही आर्थिक उत्पन्न मिळते. गायी, म्हशी यांचे पालन दुध उत्पादनासाठी केले जाते.[३] ते प्राथमिक व्यवसायाच्या मिश्र शेतीचा एक भाग आहे.[४]

दुध हे पूर्ण अन्न समजले जाते. पोषक द्रव्याचे प्रमाण दुधामध्ये जास्त आहे. दुधापासून दही, ताक, लोणी, तूप, पनीर इत्यादी पदार्थ बनविले जातात. भारतीय लोक आहारामध्ये मोठ्या प्रमाणात दुधाचा उपयोग करतात.[५] त्यामुळे दुधाचे आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन शेतकरी व शेतमजूर कृषीला पूरक पाशुपालन व दुग्ध व्यवसाय करत आहेत.

पशुपालन व दुग्ध व्यवसाय हे भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देतात.[६] भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनात कृषी व कृषी व्यवसायाचा हिस्सा २४.२ टक्के आहे, त्यापैकी पशुधन व दुग्ध व्यवसायाचा ११ टक्के इतका वाटा आहे.[७] म्हणून कृषीपूरक व ग्रामीण जीवनातील बेरोजगारी सोडवण्यासाठी पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अर्थात कृषीपुरक आणाऱ्या व्यवसायात पशूपालन हा प्राचिन काळापासून करत असणारा प्रमुख पुरक व्यवसाय आहे.

- **अभ्यास क्षेत्र :**

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्याचे महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी स्थान आहे. जिल्हा १९°१८' ते २०° ४०' उत्तर अक्षांश आणि ७४°३४' पूर्व रेखांश दरम्यान स्थिर असून, जिल्ह्याला उत्तरेकडून जळगाव जिल्हा, पुर्वेस जालना जिल्हा, दक्षिणेस अहिल्यानगर व बीड जिल्हे आणि पश्चिम दिशेस नाशिक जिल्ह्याची सीमा लाभलेली आहे.[८] जिल्ह्याची विभागणी एकूण ०९ तालुक्यात करण्यात आली आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १०१३६.६१ चौ. कि. मी. इतके आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण ३७०१२८२ इतकी लोकसंख्या व जिल्ह्यात १३५६ गावे समाविष्ट आहेत.[९]

- **शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) अभ्यास क्षेत्रातील तालुका-निहाय दुभत्या गाई व म्हशी पशुपानाचा आढावा घेणे.

२) जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनाचा अभ्यास करणे.

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेख द्वितीय स्त्रोतावर आधारित असून, त्यात विषयाशी संबंधित पुस्तके, शासकीय अहवाल, प्रकाशित शोधनिबंधे, अप्रकाशित साहित्य, जिल्हा जनगणना अहवाल (२०११), जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन इ. व भौगोलिक तंत्रात नकाशा, आलेख, संगणक सॉफ्टवेअर आणि संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्याकरिता पुढील सांख्यिकीय पद्धतीत वापरली आहे.

**सुत्र :**

$$Pr = \frac{Pn - Po}{Po} X100$$

Pr = दुग्ध संकलन दर

Pn = चालू वर्षाचे मूल्य

Po = मागील वर्षाचे मूल्य

100 = % मूल्यासाठी

- **शोध निबंध मर्यादा :**

प्रस्तुत शोध लेखात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तालुका-निहाय दुभत्या गाई व म्हशी पशुपालन व त्यांच्याशी संबंधित दुग्ध संकलन / उत्पादनाचा आढावा घेतला आहे. त्यासाठी सन २०२३-२४ या वर्षातील

सांख्यिकीय आकडेवारीचा आधार घेतला आहे, तसेच वर्ष २०२२-२३ ते २०२३-२४ या वर्षातील दुग्ध संकलनातील वाढ / घट अभ्यासण्यात आली. ही शोध लेखनाची मर्यादा आहे.

- **विषय विवेचन :**

अभ्यास क्षेत्रात दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय असल्याने शेतकरी व शेतमजुरांना त्याचा फायदा होत असल्यामुळे पशुधन व दुध उत्पादन जिल्ह्यात समाधानकारक आहे.[१०] जिल्ह्यातील पशुपालन व दुग्ध उत्पादन पुढीलप्रमाणे...

**अ. औरंगाबाद जिल्ह्यातील गायी आणि म्हशी पशूपालन:**


**तक्ता क्र. १**

**तालुका-निहाय दुभत्या गाई आणि म्हशी पशुपालन (संख्या)**

| अ. क्र. | तालुके | विदेशी गाई | संकरित गाई | इतर संकरीत गाई | देशी गाई | अवंगीकृत गाई | देशी म्हशी | अवगींकृत म्हशी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कन्नड | २४२९ | १०२७८ | ७८ | ८३० | ८९९५ | १६०१ | ४२६१ |
| २ | सोयगाव | ३९ | २०२ | ४० | ४८२ | ३८५५ | ४०५ | १८०० |
| ३ | सिल्लोड | १७१३ | ६०७९ | ४२ | ७२७ | ४५९९ | १८२२ | ४५२८ |
| ४ | फुलंब्री | ९०६ | १२५०९ | ५१९५ | १९५ | २०९८ | ९७९ | ११८४ |
| ५ | छ. संभाजीनगर | ४०६० | ८६७५ | ४०३ | ७३० | ५८३७ | ८१६५ | २३८२ |
| ६ | खुलताबाद | १०८ | ५२३१ | ५ | २२५ | २३२८ | १९५२ | ११९४ |
| ७ | वैजापूर | २४८९ | ७४९८ | २० | ६८४ | ७१२७ | ७९२ | ६२० |
| ८ | गंगापूर | २२०१ | ३९६० | १२५ | १०७९ | ६६०६ | ७९७ | ११६० |
| ९ | पैठण | १००२ | ५०४४ | ० | ९७५ | ८५८९ | २८१७ | १८५४ |
| एकूण जिल्हा | | १४९४७ | ५९४७६ | ७१८ | ५९२७ | ५००३५ | १९३३० | १८९८३ |

**स्रोत**: सामाजिक-आर्थिक समालोचन, छ. संभाजीनगर जिल्हा-२०२४[११]

**औरंगाबाद जिल्ह्यातील गायी आणि म्हशी पशूपालन**




वरिल तक्ता व ग्राफ वरून असे लक्षात येते की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तालुका-निहाय एकूण विदेशी, संकरित इतर संकरित, देशी आणि अवगीकृत दुभत्या गाईंची १३१, १०३ इतकी संख्या आहे, तर ३८, ३१३ इतक्या देशी व अवगीकृत दुभत्या म्हशीची संख्या आहे. अवगीकृत म्हणजे (गाई / म्हशी) त्या अजून कोणत्याही विशिष्ट जातीच्या नसून त्या मिश्र प्रजाती आहेत.

जिल्ह्यात तालुका-निहाय विदेशी गाईची संख्या १४९४७, संकरित गाई ५९४७६, इतर संकरित गाई ७१८, देशी गाई ५९२७ आणि अवगीकृत गाईची संख्या ५००३५ इतकी आहे. जिल्ह्यात तालुका-निहाय देशी म्हशीची संख्या १९३३० इतकी तर अवगीकृत १८९८३ इतक्या दुभत्या म्हशी आहेत. जिल्ह्यात तालुका-निहाय सर्वाधिक ५९४७६ इतकी संख्या दुभत्या संकरित गाईची आहे तर सर्वात कमी ७१८ दुभत्या संकरित गाई उपलब्ध आहेत.

**ब) तालुका-निहाय दुग्ध (संकलन) उत्पादनातील बदल** (२०२२-२३ ते २०२३-२४) :


अभ्यास क्षेत्रात तालूका-निहाय सन २०२२-२३ ते २०२३-२४ या काळात दुग्ध (संकलन) उत्पादनातील बदल पुढील तक्त्याच्या सहाय्याने दर्शविला आहेव.

**तक्ता क्र. २**

**तालुका-निहाय दुग्ध (संकलन) उत्पादनातील बदल (२०२२ ते २०२४)**

| अ.क्र. | तालुके | एकूण दुग्ध संकलन ००० लिटर | | दुग्ध संकलनाची मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा वाढ/घट % मध्ये |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२३-२४ | |
| १ | कन्नड | २६४३ | २८२९ | ०७.०३ |
| २ | सोयगाव | ०० | ०३६ | ००.०० |
| ३ | सिल्लोड | ४०७४ | ७८१३ | ९१.७६ |
| ४ | फुलंब्री | ३८४४ | ३५७९ | -०६.८९ |
| ५ | छ. संभाजीनगर | ५४९६ | ६०९४ | १०.८९ |
| ६ | खुलताबाद | ८९२० | ६६७० | -९२.५२ |
| ७ | वैजापूर | १७८३ | २४०४ | ३४.८५ |
| ८ | गंगापूर | ११०० | ११४४ | ०३.९६ |
| ९ | पैठण | २०५६ | २३८८ | १६.१७ |
| **जिल्हा एकूण** | | **२९९१७** | **३२९५७** | **१०.१६** |

**स्त्रोत**: सामाजिक-आर्थिक समालोचन, छ. संभाजीनगर जिल्हा-२०२४[१२]




वरिल तक्ता व आलेखावरून स्पष्ट होते की, सन २०२२-२३ या वर्षात जिल्ह्यात तालुका-निहाय एकूण २९९१७ लिटर दुधाचे उत्पादन झाले, तर सन २०२३-२४ या वर्षात तालूका-निहाय एकूण ३२९५७ लिटर दूध संकलित केल्याचे आढळते. एकंदरित अभ्यास क्षेत्रात तालुका-निहाय दुध उत्पादनात वर्ष २०२२-२३ ते २०२३-२४ या अभ्यास काळात १०.१६ टक्के इतकी दूध उत्पादनात वाढ झाली आहे.

**निष्कर्ष** :

१) अभ्यास क्षेत्रातील विदेशी गाईंची सर्वाधिक संख्या (४०६०) छत्रपती संभाजीनगर तालुक्यात आहे, तर सर्वात कमी संख्या (३९), सोयगाव तालुक्यात असल्याचे निदर्शनास आले.

२) जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात दुभत्या संकरित गाईंची संख्या सर्वाधिक (१२५०९) आहे, तर सर्वात कमी दुभत्या संकरित गाईंची संख्या (२०२) सोयगाव तालुक्यात असल्याचे आढळले.

३) जिल्ह्यातील इतर संकत दुभत्या गाईंची सर्वाधिक संख्या (४०३) छत्रपती संभाजीनगर तालुक्यात आहे, तर सर्वात कमी इतर संकरित गाईची संख्या (०५) ही फुलंब्री व खुलताबाद आहे.

४) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालूक्यात इतर संकरित दुभत्या गाई नसल्याचे निदर्शनास आले.

५) अभ्यास क्षेत्रात दुभत्या गाईंची सर्वाधिक संख्या (१०७९) गंगापूर तालुक्यात आहे, सर्वात कमी दुभत्या गाईची संख्या (१९५) फुलंब्री तालुक्यात आढळून आल्या.

६) जिल्ह्यात तालुका-निहाय दुभत्या अवगीकृत गाईची सर्वाधिक संख्या (८९९५) कन्नड तालुक्यात आहे, तर सर्वात कमी दुभत्या अवगीकृत गाईची संख्या (२०९८) फुलंब्री तालुक्यात आढळून आल्या.

७) जिल्ह्यात देशी म्हशींची सर्वाधिक संख्या (८१६५) छ. संभाजीनगर तालुक्यात आहे, तर सर्वात कमी देशी म्हशींची संख्या (४०५) सोयगाव तालुक्यात असल्याचे निदर्शनास आले.

८) जिल्ह्यात दुभत्या अवगीकृत म्हशींची सर्वाधिक संख्या (४५२८) सिल्लोड तालुक्यात आहे, तर सर्वात कमी अवगीकृत म्हशींची संख्या (६२०) वैजापूर तालूक्यात आढळते.

**संदर्भ सूची :**


१. सवदी ए. बी. आणि कोळेकर पी. एस. (२०११) : भूगोलाची मूलतत्वे, (खंड दूसरा), निराली प्रकाशन, पुणे, पृ. २६१

२. घारपुरे विठ्ठल (२०१३) : कृषी भूगोल, पिंपळापूरे आणि कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ. ३१

३. मोरे सोनाली अमर आणि बैसाने विजय (२०२४): 'सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पशुपालन: एक अभ्यास' International Journal of Creative Research Thoughts, Vol-12, Issue-1, P-9579.

४. अहीर सोहन लाल आणि पठानिया संध्या (२०२०): 'भारत में दुग्ध उद्योग (एक भौगोलिक परिप्रेक्ष्य), International Journal of Humanities and Social Science Invention, Vol-९, Issue-12, P-६९

५. मुसळे नवनाथ पंढरीनाथ (२०२३): 'हिंगोली जिल्ह्यातील पशुपालन व्यवसायाचा भौगोलिक अभ्यास', पीएच.डी. प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पृ.८

६. भारत सरकार (२०२४-२५): 'वार्षिक रिपोर्ट' पशुपालन और डेयरी विभाग, मत्स्यपालन, पशुपालन और डेयरी विभाग, पृ. ३.

७. जाधव भरत (२०१४): 'सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ स्थापना व कार्याचा संक्षिप्त आढावा' Review of Research, Vol-3, Issue-12, P-1

८. Census of India (2011): 'District Cencsus Handbook', Aurangabad District, Series-28, Part-xii-A, P-11

९. महाराष्ट्र शासन (२०२४): 'जल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', जिल्हा छत्रपती संभाजीनगर, जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, पृ. १२, १३

१०. कित्ता, पृ. १५

११. कित्ता, पृ. ७३

१२. कित्ता, पृ. ७३

१३. dahd.gov.in

१४. census.india.gov.in

१५. mahades.maharashtra.govt.in